# त्रैमासिक 'भावमाला' परिवाराकडून संशोधन लेख मूल्यांकन समिती

## (रिसर्च पेपर रिव्हिव्ह कमिटी)

(खालील प्रमाणे सत्र २०१९-२०२० साठी नियुक्त केली आहे.)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. गजानन घोंगटे, कारंजा लाड | ९८२२४०६११५ |
| २. | प्रा. डॉ. नवनाथ गोरे, औरंगाबाद | ९४२३२६१११४ |
| ३. | प्रा. डॉ. गणेश चव्हाण, नागपूर | ९८५०३२४२९८ |
| ४. | प्रा. डॉ. संजय पाटील, वाशीम | ९२७२७७१७०० |
| ५. | प्रा. डॉ. उदय जाधव, खटाव, सातारा | ९४२३८०७५०५ |
| ६. | प्रा. डॉ. प्रियदर्शनी देशमुख, चांदूर बाजार | ९०९६२६६८१६ |
| ७. | प्रा. डॉ. अनिल बाभूळकर, अकोट, अकोला | ९९२१५८६८२८ |
| ८. | प्रा. डॉ. कल्पना मेहरे, बडनेरा, अमरावती | ९९२२९४५३२६ |
| ९. | प्रा. डॉ. संतोष चव्हाण, अमरावती | ९८२२९४५९४३ |
| १०. | प्रा. डॉ. वर्षा चिखले, अमरावती | ८८०६०९६६९९ |
| ११. | प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे, अमरावती | ९४२३१५२९१२ |
| १२. | प्रा. डॉ. रूपेश कऱ्हाडे, दिग्रस, यवतमाळ | ९४२२८२२९६९ |
| १३. | प्रा. डॉ. विनायक त्रिपत्तीवार, धामणगांव रेल्वे | ९०७०९३१९६७ |
| १४. | प्रा. डॉ. शरद वाघोळे, मंगरूळ पीर, वाशीम | ९४२१७४५३३५ |
| १५. | प्रा. डॉ. सुनंदा रेवसे, नांदुरा रेल्वे | ९४२१७४६९७५ |
| १६. | प्रा. डॉ. लता जावळे/खडसे, मालेगांव | ७८७५९९३२४० |
| १७. | प्रा. डॉ. माधव जाधव, नांदेड | ९४२३४३९९९१ |



ISSN2395-0366

www.bhavmala.com

# भावमाला

वर्ष-६ वे, अंक-२४, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२०

85

• संपादक - प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे •



नुतन वर्ष अभिनंदन....!

# अंतरंग


ोध निबंध-

) मराठीचे तीन विष्णू - डॉ. ज. पा. खोडके
) विदर्भ केसरी ब्रिजलाल बियाणी व विदर्भ चळवळ - ध. ग. बोबडे
) स्त्री : काल आणि आज - डॉ. सुनंदा रेवसे
) मराठी साहित्य आणि आजचे वास्तव - डॉ. प्रल्हाद वावरे

रीक्षणे / प्रतिक्रिया -

१) 'रत्नदीप, हे'-एक अमूल्य खजीना - ध. ग. बोबडे
२) 'दीपज्योती'-प्रबोधनात्मक आशयघण काव्यसंग्रह - प्रा. शांताराम हिवराळे
३) 'वादळातील दिपस्तंभ'-एक सामाजिक जाणिवेचं प्रतिबिंब - राजेश चौरपगार
४) 'भावमाला'-साहित्य प्रतिभेचा वारकरी - अरूण विघ्ने
५) 'भावमाला'-एक सशक्त साहित्यिक अभिव्यक्ती - राजेंद्र घोटकर
६) 'राजहंसाचा चारा...' - राम देशमुख

• कथा / ललित -

१) आठवणींची पिसे - प्रा. मीनल येवले
२) पाऊस....काही अस्तित्वखुणा - प्रशांत ढोले
३) खंत... - प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे

• कविता-

१) सावित्री - माधुरी गणेश मरकड
२) घरधनी - प्रा. राजाराम बनसकर
३) गझल - राजेंद्र घोटकर
४) अवदाचं साल - खुशाल गुल्हाणे
५) माहेर - प्रा. डॉ. लताताई थोरात
६) भिंत - राम देशमुख
७) गोकूळ - वि. गु. गोंडचर
८) हरविलेल्या कवितेसारखे - मधुकर गराटे
९) नातं रिचार्ज करू - संकलक- चि. ओंकार मनिष व्यवहारे
१०) रेशीमगाठी - विजय बिंदोड
११) "नाही नाही...!!" - संदीप धावडे दहीगांवकर
१२) नातं (चारोळी) - स्मिता खवले-बैलमारे



हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी निलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्क क्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशीत केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मतांशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत राहील.




## संपादकीय....

मित्रांनो,

सरले वर्ष आला हर्ष....साल २०१९ ला निरोप आणि नववर्ष २०२० चे स्वागत....आजच्या या नववर्षात आपणासर्वांना सुख, आनंद, समृद्धी, आरोग्य, तसेच मनात ठरविलेल्या आशा-आकांक्षांना आकार मिळो हीच अपेक्षा....

'भावमाला' आता लगेचच सातव्या वर्षात पदार्पण करतेय...खरच काळ कसा भराभर निघून जातोय या नववर्ष सुरवातीचा हा २४वा अंक आपले हाती देतांना मला मनस्वी आनंद होत आहे. आजवर वाटावळणे घेत ही साहित्य चळवळ पुढे जात आहे, मित्रांनो, नवोदितांच हे व्यासपीठ तर आहेच...पण आज मला जेष्ठ साहित्यविचारवंतांचा, साहित्यिकांचा खूपच आधार आहे कारण प्रत्येक अंकांत जवळ जवळ नव्वद टक्के साहित्य या मंडळींचं आहे, खूप आदर देतात, आवर्जून प्रतिक्रिया देतात, साहित्य पाठवतात मिळालं किंवा नाही यांची नोंद घेतात, मला खंत नव्यापिढीकडून वाटते कारण अंक दिल्यावरही कोणतीही प्रतिक्रिया न देणं याचा अर्थ न वाचणं हा होय...चळवळ कशी पुढे जाणार फक्त प्रसिद्धीसाठी काही लोक आटापिटा करतात आणि आपल्याच कुटूंबातील बायकापोरांचा सत्कार स्वत: च करून घेतात हेही आपण आज साहित्य चळचळीत पाहतो....बावन्नकशीला दाखवायची गरजच नाही मी सोनं आहे म्हणून ते दिसतेच...अर्ध्या हळकंडाने पिवळी झालेली काही माणसं खूप भारलेली वाटतात पण खरं स्वरूप जाणवते तेव्हा आपला विश्वास उडतो...आज माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात खूप प्रतिभावंतां ची ओळख आपल्याला होतेय ही खूप चांगली गोष्ट आहे पण फक्त प्रसिद्धीसाठी वास्तवाचं विस्मरण होणं हे सुद्धा धोक्याचं आहे...आज जगण्यातील तकलादूपणा दिसू लागलाय कारण आपले अस्तित्व टिकविण्यासाठी आज जास्त धडपडण्याची आवश्यकता नाही तर सोशल मिडीयाच्या माध्यमातून आपण ती हौस भागवून घेवू शकतो, माझ्यासारखा वेडा एखादी साहित्य पत्रिका नेटाने चालविते तेव्हा माझ्या विद्वान मित्रांना खूप हेवा वाटतो...अन...आता हा कशाला हे चालवितोय...फायदा असेलच त्याला तसं कुणी या जमान्यात काही करतय का ? हा शेरा ठरलेलाच... आपण काही करायचं नाही, कुणी करत असेल तर त्याला खोडा घालायचा...

काही मित्र मात्र खूप दिलदार त्यांचाही उल्लेख मला आता सहावर्षाच्या प्रदीर्घ अंक काढण्याच्या उपदव्यापात करावाच लागेल कारण खूप मनापासून त्यांना वाटते ही चळवळ चालली पाहिजे त्यासाठी पटकण हात खिशात जातो त्यांचा...पैसे घेवून रिसर्चपेपर छापणाराकडे आमच्या मंडळींचा फार ओढा असतो कारण पद वाढलं पाहिजे त्यासाठी त्याने मागीतले तेवढे बिनदिक्कत देणारे हे लोक सुद्धा दिसतात... आपण पाहत रहावं...काही लोक अंक घेतात, ठेवून देतात...मला त्याही लोकांचा आनंद वाटतो कारण आता सहा वर्षांतला अनुभव असा आहे की,,,न सांगीतलेला बरा....असो आपल्याकडून जमेलतेवढी आपल्या मायमराठीची सेवा "एकला चलोरे" या न्यायाने करण्याचा मी वसा घेतलेला आहे तो टाकणार नाही या विश्वासासह...

पुनच्च आपणासर्वांना नववर्षाच्या भरभरून शुभेच्छा.....

- प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे,
संपादक, भावमाला

## अंतरंग


• शोध निबंध-

१) मराठीचे तीन विष्णू – डॉ. ज. पा. खोडके
२) विदर्भ केसरी ब्रिजलाल बियाणी व विदर्भ चळवळ – ध. ग. बोबडे
३) स्त्री : काल आणि आज – डॉ. सुनंदा रेवसे
४) मराठी साहित्य आणि आजचे वास्तव – डॉ. प्रल्हाद वावरे

• परिक्षणे / प्रतिक्रिया –

१) 'रत्नदीप, हे'–एक अमूल्य खजीना – ध. ग. बोबडे
२) 'दीपज्योती'–प्रबोधनात्मक आशयघण काव्यसंग्रह – प्रा. शांताराम हिवराळे
३) 'वादळातील दिपस्तंभ'–एक सामाजिक जाणिवेचं प्रतिबिंब – राजेश चौरपगार
४) 'भावमाला'–साहित्य प्रतिभेचा वारकरी – अरूण विघ्ने
५) 'भावमाला'–एक सशक्त साहित्यिक अभिव्यक्ती – राजेंद्र घोटकर
६) 'राजहंसाचा चारा...' – राम देशमुख

• कथा / ललित –

१) आठवणींची पिसे – प्रा. मीनल येवले
२) पाऊस....काही अस्तित्वखुणा – प्रशांत ढोले
३) खंत... – प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे

• कविता-

१) सावित्री – माधुरी गणेश मरकड
२) घरधनी – प्रा. राजाराम बनसकर
३) गझल – राजेंद्र घोटकर
४) अवदाचं साल – खुशाल गुल्हाणे
५) माहेर – प्रा. डॉ. लताताई थोरात
६) भिंत – राम देशमुख
७) गोकूळ – वि. गु. गोंडचर
८) हरविलेल्या कवितेसारखे – मधुकर गराटे
९) नातं रिचार्ज करू – संकलक– चि. ओंकार मनिष व्यवहारे
१०) रेशीमगाठी – विजय बिंदोड
११) "नाही नाही...!!" – संदीप धावडे दहीगांवकर
१२) नातं (चारोळी) – स्मिता खवले-बेलमारे



हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी निलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्क क्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशीत केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मतांशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत राहील.




# स्त्री : काल आणि आज


– प्रा. डॉ. सुनंदा रेवसे


परमेश्वराने जगात सर्वात सुंदर कोणाला बनविल असेल ता ते स्त्रीला. पण याच स्त्रीची आमच्या समाजव्यवस्थेने काय विल्हेवाट लावली बघा. अहो स्वातंत्र्य तर तिला कधी नव्हतच. भाऊ, वडील, पती, पुत्र इ. पक्षांना तिची कक्षा बांधून टाकली होती. परंपरेने सुद्धा तिच्या भूमिका निश्चित केल्या होत्या. उदा.–

'परंपरा मे है मंत्रीशी । सेवा मे नित दासी है ।।
भोजन मे माता के सम है । शयनसमय रंभाशी है ।।
शर्म कर्म मे सदा संगीनी । शेष सहिष्णू धराशी है ।।
छह आदर्श गुणो से शोभित । शेष सहिष्णू धराशी है ।।'

एकीकडे नारीला आम्ही 'पुण्यसमुच्चय' म्हणतो तर दुसरीकडे तिला 'पापाची खाण' म्हणतो. 'नच स्त्री स्वातंत्र्य महेती' म्हणून तिचा धिक्कार करतो. यासंदर्भात छोट्या छोट्या दोन गोष्टी नमूद कराव्याशा वाटतात.

'याज्ञवल्क्यस्मृतीत' याज्ञवल्क्याच्या सन्यासाचा एक संदर्भ येतो. याज्ञवल्क्याला दोन बायका असतात मैत्रेयी आणि कात्ययनी. एक दिवस याज्ञवल्क मैत्रीयाला म्हणतो, मी सन्यास घेतो आहे तेव्हा तुझ्यामध्ये व कात्यायनीमध्ये साऱ्या संपत्तीची वाटणी करतो' कात्यायनी संपत्ती घेते पण मैत्रेयी त्याला विचारते, 'संपत्तीने भरलेली ही सारी सृष्टी माझी झाली, तर मला अमरत्व मिळेल काय? याज्ञवल्क म्हणतो, 'नाही तू सुखानं जगशील पण तुला संपत्तीच्या जोरावर अमर मात्र होता येणार नाही ते घेवून मी काय करू? तेव्हा मला आपण ज्ञान द्यावे.' याज्ञवल्क तिला आत्म्याच्या स्वरूपाचे विवेचन करतो व निघून जातो' (१)

दुसरी कथा आहे गार्गीची 'ब्रह्मज्ञानात सर्वश्रेष्ठ कोण? हे ठरवितांना ती हे सर्व श्रेष्ठत्वाचं प्रशस्तीपत्र याज्ञवल्क याला देते पण त्यापूर्वी त्याच्यावर प्रश्नांचा भडीमार करते. याज्ञवल्क्य तिला उत्तरे देतो. पण शेवटच्या प्रश्नाला त्याची सहनशक्ती संपुष्टात येते, व 'मर्यादांच उल्लघन करू नकोस.' असे प्रश्न विचारले तर तुझ मस्तक गळून पडेल' असं तो धमकीवजा बोलतो.तरीही इतर लोकांच्या परवानगीने गार्गी त्याला परत प्रश्नं करते व त्याच्या विद्वतेची खात्री पटताच ब्रह्मविद्येत त्याला तुमच्या पैकी कोणी हरवू शकणार नाही असं जमलेल्या ब्रह्मवृंदाला सांगून जनक राजाच्या हजार गायी ज्यांच्या शिंगाना सोनं बांधलं आहे, त्या नेण्यास याज्ञवल्क्याला परवानगी देते."(२)

या दोन्ही कथा भारतीय संस्कृतीत स्त्रीची जागा कुठे होती हे सूचित करतात. पहिली कात्यायनी–घरात, ऐहिक सुखात रमणारी एक सामान्य पारंपरिक गृहीणी. दुसरी

मैत्रेयी-जिला ज्ञानाची आस आहे पण त्या ज्ञानप्राप्तीसाठी नवऱ्यासमोर नम्रता धारण करायला हवी आणि त्याच्या परवानगीनेच आपला उत्कर्ष आपल्याला साधता येईल हे ओळखून असणारी विनम्र पत्नी. आणि तिसरी गार्गी-भरसभेत एका विद्वान ऋषीच्या बुद्धीमत्तेला आव्हान देणारी आणि म्हणूनच 'मर्यादेचं उल्लघन करू नकोस', नाहीतर तुझं मस्तक गळून पडेल' या त्याच्या शापवाणीला आणि 'अहं' दुखावलेल्या पुरूषाच्या रोषाला पात्र होणारी एक बुद्धीवादी स्त्री! यावरून एक लक्षात येतं की, १) संसारात सुख माणणाऱ्या २) संसार करतांनाही बौद्धीक उत्कर्षासाठी तडफडणाऱ्या आणि ३) सर्व प्रकारच्या ऐहिक सुखांना मागे सारून केवळ 'बुद्धीवादी' म्हणूनजगणं पसंत करणाऱ्या अशा तीन गटाचं प्रतिनिधित्व करतात: कात्यायनी, मेत्रेयी आणि गार्गी.

प्राचीनकाळचं हे चित्र आजही काही फारसं बदललं असं म्हणता येणार नाही. आपल्या समाजाची एकंदर घडणच अशी आहे की, त्यात स्त्रीला 'माणूस' म्हणून स्थान नाही. सर्व काळात तिच्यावर पुरूषाची अनिर्बंध सत्ता असल्याचं पहावयास मिळतं. उच्चवर्णियांनी कनिष्टवर्णियाला आणि पुरूषाने स्त्रिला वेठीस धरावं, हे माणसांच्या जगातलं सर्वसाधारण चित्र आहे. 'ढोल गवार, शुद्र, पशु नारी, ये सब ताडण के अधिकारी' अशासारख्या मानसिकतेने स्त्रीपुरूष विष्मतेची एक फार मोठी दरी निर्माण झालेली होती. इंग्लंडसारख्या आधुनिक सांसदीय लोकशाहीचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या राष्ट्रात स्त्रियांना केवळ मताधिकाराचा हक्क प्राप्त होण्यासाठी इ. स. १९२८ सालापर्यंत वाट पहावी लागली.

भारतात स्त्रीला शुद्र ठरवलं गेलं होतं. तिला वेदाधिकार नव्हता. तिला व्यक्तीगत संपत्ती समजलं जायचं. ही स्त्री म्हणजे देवदासी, राजदासी, भोगदासी आणि आज अर्थदासी ठरवली गेली आहे. ही कन्या खरं म्हणजे दुःखरूप ठरली. तिचा हा अधःपात शतकानुधतके होत राहिला.

पण म्हणतात ना, काळयाकुट्ट मेघांना कुठेतरी रूपेरी कडा असते. त्याप्रमाणे सामाजिक जाचक रूढीविरूद्ध लढणाऱ्या म. ज्योतिबा फुले, महर्षि विठ्ठलराव शिंदे, महात्मा गांधी, महर्षि धोंडो केशव कर्वे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. पंजाबराव देशमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा बंडखोर विचारवंतांची एक अखंड फळी एकोनिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झाली. धर्माच्या, रूढींच्या, पुरूषांच्या दास्यातून स्त्रीची मुक्तता करणे हाया सर्व समाजसुधारकांच्या लढ्याचा एक समान उद्देश होता. या आक्रमक वृत्तीच्या बंडखोरात एक समाजसुधारक शुक्रताऱ्या प्रमाणे चमकत होता आणि तो म्हणजे म. फुले होय. महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी तर एका विधवेशी त्या काळात विवाह करून समाजात नवा आदर्श घडवून दिला होता. म. फुले आणि सावित्रीबाई फुले हे दांपत्य तर स्त्रीसुधारणेचे अध्वर्यूच होतं.

इ. स. १८२४ ते १९१० याकाळात स्त्रियांच्या बाबतीत सामाजिक प्रबोधन



मोठया प्रमाणात घडून आले. आणि यादरम्यान सावित्रीबाई फुले, डॉ. आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, ताराबाई शिंदे अशा कर्तृत्ववान स्त्रिया उदयाला आल्या. 'जिथे देवाचे स्वरूपच माणसाने ठरविले, तिथे माणसाचे स्वरूप तुम्ही कोण ठरविणार?' असा परखड सवाल टाकून सत्यशोधनाचा झेंडा रोवणारा हा सामाजिक क्रांतीचा अग्रदूत नवविचार-आचारांची सुमने उधळणारा म. फुले, 'तू माणूस आहेस, तू ज्या मातीते जन्मलास तिने तुझे मोल ठरत नाही.' असे बजावणारा हा माळी बहुजन समजाची बाग फुलवून गेला. आणि ह्या बागेला प्रफल्लीत, सुगंधीत व रंगायमान करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या एका युगाचा प्रारंभ झाला. बाबासाहेबांनी फुल्यांच्या विद्रोहीसी आपले नाते जोडून येथील जाचक मूल्यव्यवस्थेवर प्रहार केले. प्राचीन भारतातील बुद्धिप्रामाण्य व समतावादी वारश्यांचे कालोचित पुनरूज्जीवन करून समाजातील क्रांतीची दिशा सूचित केली.

राष्ट्संत तुकडोजी महाराज म्हणतात-काय स्त्रियांनी युद्ध नाही केले? पती पुत्रांनाही प्रोत्साहन नाही दिले? हजारो स्त्रिया फुलांहूनही नाजूक ब्रिदासाठी जाहल्या राख...

'त्यांचे करावे तेवढे कौतुक । थोडेचि आहे
स्त्रियेसारखी मोहिनी नाही । स्त्रियेसारखी विरांगीणी नाही,
स्त्रियेसारखी मुलायम नाही । आणि कठोर रणचंडिका...'

आज गरज आहे स्त्रियांमधील अधिकाराची उणीव घालविण्याची. ती जिवनाच्या विविध क्षेत्रात मुक्त संचार करीत आहे. पुरूष जी जी कामे करतात ती ती सर्व कामे स्त्रिया करतांना दिसतात. (सापडला तर तो एखादा अपवाद समजावा) ती मोठ्या कंपन्यांमधून, कारखाण्यांमधून एक्झीकेटिव्ह असते. कंपन्यांच्या कामासाठी परदेश प्रवास करते. स्त्री असून अनेक पुरूष सहकाऱ्यांबरोबर मोकळेपणाने कामे करते. त्यांना दाबातही ठेवू शकते. व्यापार उद्योगापासून तो राजकारणापर्यंत आणि विविध उत्पादनापासून तो नवनवे शोध लावण्यापर्यंत सारे काही ती जबाबदारीने व पुरूषा इतक्याच कार्यक्षमतेने करते. काही काही स्त्रियांनी तर डॉ. कोल्हे, गोदावरी परूळेकर, मेघा पाटकर इ. इ.) स्वतःला सामाजिक कार्यात गुंतवतात व त्यासाठी दुर्गम प्रदेशात, आदिवासी लोकांमध्ये निर्भयपणे एकट्यादेखील राहून आपल्या कार्याची धुरा सांभाळतात.

ग्रामीण स्त्रिया, दलित स्त्रिया, मुस्लिम स्त्रिया, आदिवासी स्त्रिया समाजाच्या अगदी तळागाळातल्या स्त्रिया शिकत आहेत. नोकऱ्याही मिळवत आणि करत आहेत. अनेक स्त्रिमुक्तीवादी संस्थांच्या आणि कार्यकर्त्या स्त्रियांच्या अथक प्रयत्नांमुळे विवाहित स्त्रियांवर किंवा प्रोढ कुमारीकांवर होणाऱ्या जुलूमजबरदस्तीला कमी अधिक प्रमाणात वाचाही फुटत आहे. हुंड्यासाठी पत्नीचा छळ होणे, माहेरहून विशिष्ट वस्तु आणण्याची तिच्यावर सक्ती करणे, त्यासाठी तिला जाळणे, पोळणे, पेटविणे, विष पाजणे इ. अन्याय पूर्वीसारखे आता चा भिंतीत दडपले जात नाहीत. आता ते कोर्टापुढे येत आहेत. तसे

भक्कम कायदेही स्त्रीच्या सरंक्षणासाठी सज्ज आहेत. छळवादी पती, नणंदा, सासू सासरे यांना शिक्षाही ठोठावल्या जात आहेत. मिडीयावर क्राईमपेटोल, सावधान इंडियासारखे समाजवास्तव दाखविणारे प्रसंग चित्रित केल्या जातात. त्यातून नवीन पिढीवर प्रबोधनात्मक संस्कार केले जातात. त्यातून अलर्टनेस वाढीस लागतो. बलात्काराच्या केसेसमध्येही पुरूषामधील नराधमा ना शासन होत आहे. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे हिंदू कोडबिलाने तर स्त्रियांना कवच प्राप्त करून दिले आहे. हे सर्व कायद्याने मान्य आहे. स्त्रीच्या अर्थाजनाचे स्वातंत्र्य समाजाने बहुतांशी स्विकारले आहे. पण त्या पैशाचा विनियोग कुठे व कसा करायचा या संदर्भांत आजही बऱ्हंशी स्त्रियांना स्वत:चे मत नाही असे निरिक्षणाअंती दिसते.

मिळकतीच्या निमित्ताने निमित्ताने घराबाहेर पडणाऱ्या स्त्रीला आता बाहेरचे वारे लागले आहे. मोकळ्या वातावरणात श्वास घेण्याची तिला सवय लागली आहे ही स्त्री आता पुन्हा घराच्या चार भिंतीत स्वत:ला कोंडून घेईल असे वाटत नाही अशी तिच्याबद्दल सर्वसामान्यांना भिती वाटायला लागली आहे. पण विश्वास ठेवा, निरर्थक चिंता अजिबात करू नका. स्त्री घरदार सोडून दिवसभर जरी बाहेर पडली तरी संध्याकाळी ती तिच्या घरट्याकडे परतणार म्हणजे परतणारच. यासंदर्भात ऋतुचक्रमधील दुर्गाबाई भागवत यांची एक रूपककथा समजून घेण्यासरखी आहे.

एका झाडावर पक्षीणीने आपल्या बाळासाठी घरटे तयार केले. आपल्या कोवळ्या लुसलुसीत बाळाला काट्या रूतु नयेत म्हणून ती गुबगुबीत मऊ मऊ अस्तर तयार करू लागते. एकदा ती दोऱ्याची एक गुंतवळ चोचीत घेवून येते. फांदीवर बसून ती गुंतावळ उलगडू लागते. परंतु ती गुंतावळ तिच्या पायात अडकते आणि फांदीसह गुंडाळल्या जाते. ती उडायला लागते तर झाडावर अंधांतरी लटकते. तडफड करते, पण गुंत्यात गुंतल्याने अखेर ती मरते. वाऱ्या पावसाने अखेर तिचा देह झिजून झिजून अखेर तिचे पाय त्या फांदीवर झुलत राहतात. 'प्रत्येक आईची स्थिती या पक्षिणीसारखीच असते. यापेक्षा वेगळी नसतेच मुळी. कारण ती ममतेच्या पाशात गुंतलेली असते. तिला आपलेच घरटे हवे असते म्हणूनच तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात–

'जगात असती नाना जीव, संकटास जाहीर त्याचा भाव ।
परी मायाळू पणाचा गौरव । माऊ ली परीसा नाही ।
देवाने निर्मिली ही क्षिती । तिचे उदरी खाणी किती ?
परी माऊ ली जैसी प्रेमळ द्रीप्ती । कोठेच नाही ।।'

– प्रा. डॉ. सुनंदा रेवसे
नांदूरा रेल्वे जि. बुलढाणा
संवाद–९४२१७४६९७५

***



# त्रैमासिक 'भावमाला' परिवाराकडून
# संशोधन लेख मूल्यांकन समिती
## (रिसर्च पेपर रिव्हिव्ह कमिटी)

(खालील प्रमाणे सत्र २०१९-२०२० साठी नियुक्त केली आहे.)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. गजानन घोंगटे, कारंजा लाड | ९८२२४०६११५ |
| २. | प्रा. डॉ. नवनाथ गोरे, औरंगाबाद | ९४२३२६१११४ |
| ३. | प्रा. डॉ. गणेश चव्हाण, नागपूर | ९८५०३२४२९८ |
| ४. | प्रा. डॉ. संजय पाटील, वाशीम | ९२७२७७१७०० |
| ५. | प्रा. डॉ. उदय जाधव, खटाव, सातारा | ९४२३८०७५०५ |
| ६. | प्रा. डॉ. प्रियदर्शनी देशमुख, चांदूर बाजार | ९०९६२६६८१६ |
| ७. | प्रा. डॉ. अनिल बाभूळकर, अकोट, अकोला | ९९२१५८६८२८ |
| ८. | प्रा. डॉ. कल्पना मेहरे, बडनेरा, अमरावती | ९९२२९४५३२६ |
| ९. | प्रा. डॉ. संतोष चव्हाण, अमरावती | ९८२२९४५९४३ |
| १०. | प्रा. डॉ. वर्षा चिखले, अमरावती | ८८०६०९६६९९ |
| ११. | प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे, अमरावती | ९४२३१५२९१२ |
| १२. | प्रा. डॉ. रूपेश कऱ्हाडे, दिग्रस, यवतमाळ | ९४२२८२२९६९ |
| १३. | प्रा. डॉ. विनायक त्रिपत्तीवार, धामणगांव रेल्वे | ९०७०९३१९६७ |
| १४. | प्रा. डॉ. शरद वाघोळे, मंगरूळ पीर, वाशीम | ९४२१७४५३३५ |
| १५. | प्रा. डॉ. सुनंदा रेवसे, नांदुरा रेल्वे | ९४२१७४६९७५ |
| १६. | प्रा. डॉ. लता जावळे/खडसे, मालेगांव | ७८७५९९३२४० |
| १७. | प्रा. डॉ. माधव जाधव, नांदेड | ९४२३४३९९९१ |